**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १६ नुसार कार्यवाही. : अपील प्रकरणात विभागीय आयुक्तांचा निकाल अंतिम**

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- व्हीपीएम-२००८/प्र.क्र.२१७/परा-३,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.दिनांक :- १८ सप्टेंबर, २००८.

**<u>परिपत्रक :-</u>**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १४ मध्ये ग्रामपंचायत सदस्य यांच्या अपात्रतेबाबतच्या तरतुदी अंतर्भूत आहेत. सदर तरतुदीचा भंग झालेला आहे किंवा कसे तसेच ग्रामपंचायत वर निवडून आलेला सदस्य कलम १४ मधील अनर्हतेमुळे सदस्य म्हणून चालू राहण्यास असमर्थ ठरविण्यासंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १६ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांचेकडे आहेत. तसेच जिल्हाधिकारी यांच्या निर्णयमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अपीलावर अंतिम निर्णय घेण्याचे शासनाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना दिनांक ४ डिसेंबर, १९७० च्या अधिसुचनेन्वये प्रदान करण्यांत आलेले आहेत. विभागीय आयुक्त यांनी प्रस्तुत प्रकरणी घेतलेला निर्णय अंतिम असल्याने, विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाविरुध्द अपील कर्त्यास दाद मागावयाची झाल्यास त्याला थेट उच्च न्यायालयात दाद मागावी लागते. या प्रकरणी शासनाकडे अधिनियमाच्या कोणत्याही कलमान्वये दाद मागता येत नाही किंवा अपील करता येत नाही.

२. तथापि, अपील संदर्भात अनेकवेळा वरील तरतुदीची माहिती नसल्याने, जिल्हाधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द शासनाकडे अपील दाखल करण्यांत येते. त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त यांनी अपीलावर निर्णय दिल्यानंतरही शासनाकडे अपील दाखल करण्यांत येते. तथापि, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १६ खालील प्रकरणात शासनास अपील दाखल करुन घेण्याचे व निर्णय देण्याचे अधिकार नसल्याने यामध्ये अर्जदाराचा नाहक वेळ वाया जातो. तसेच शासनाचाही वेळ जातो.

३. यास्तव, सर्व जिल्हाधिकारी यांना या परिपत्रकाद्वारे निदेश देण्यात येत आहेत की, सर्व जिल्हाधिकारी यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १६ नुसार निर्णय देतांना सदर निकालपत्रात " सदर निर्णयाविरुध्द विभागीय आयुक्त यांच्याकडे १५ दिवसात अपील करता येईल व या प्रकरणी विभागीय आयुक्त यांचा निर्णय अंतिम आहे. " असे स्पष्ट नमूद करावे. तसेच वरील तरतूदींची माहिती अर्जदारास जिल्हाधिकारी यांनी निकालपत्रावेळी द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

[signature] १८.०९.०८

( मा.वा.गोडबोले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक नं.: ०3
2 848६६
- 1 OCT 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:- 3/10
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

K.W. S.O. file.

क्र. त्रिकस/डेस्क-3/ग्रापनि-४८४६६/२००८